**प्रकल्प प्रवर्तक मे. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. विलासनगर, ता.जि. लातूर — (४१३५३१) महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ४,७५० प्रती दिन पासून ७,५०० टन प्रती दिनपर्यंत (२,७५० टन प्रती दिनविस्तार) विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचे इतिवृत्त.**

प्रकल्प प्रवर्तक मे. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. विलासनगर, ता.जि. लातूर — (४१३५३१) महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ४,७५० प्रती दिन पासून ७,५०० टन प्रती दिनपर्यंत (२,७५० टन प्रती दिनविस्तार) विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी गुरुवार, दिनांक ३०एप्रिल, २०२६ रोजी दुपारी ११:३० वाजता प्रकल्प स्थान मे. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. विलासनगर, ता.जि. लातूर — (४१३५३१) महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री.पी. व्ही. नाईक, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,लातूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी माननीय श्री.केशव नेटके, अप्पर जिल्हा दंडाधिकारी, लातूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती, श्री.मनिष होळकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, स्थानिक वृत्तवाहिनी(चॅनलचे) प्रतिनिधी व मोठया संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक लोकसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर,२००६ व सुधारित दिनांक १डिसेंबर,२००९च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. विलासनगर, ता.जि. लातूर — (४१३५३१) महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ४,७५० प्रती दिन पासून ७,५००टन प्रती दिनपर्यंत (२,७५०टन प्रती दिनविस्तार) विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा अर्ज महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,लातूर यांना दिनांक ०२.०३.२०२६ रोजी प्राप्त झाला.

सदर प्रकल्प पर्यावरण अधिसूचना,२००६ आणि सुधारित अधिसुचनेनुसार संवर्गब-५(जे)- साखर उत्पादन यात मोडत असल्यांने सदर प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (राज्यस्तरीय तज्ज्ञ मूल्यांकन समिती मुंबई (SEAC), महाराष्ट्र द्वारे निर्गमित) यांची “पर्यावरण अनुमती” त्यासाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्यस्तरीय तज्ज्ञ मूल्यांकन समिती मुंबई (SEAC), महाराष्ट्र यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०९.०७.२०२४ रोजी सादर केला व त्या अर्जास राज्यस्तरीय तज्ज्ञ मूल्यांकन समितीने २१.०८.२०२४ ऑनलाईन मंजूरी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशानुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्ती करुन पर्यावरण सल्लागाराद्वारे १०.०० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण केले.

प्रकल्पाच्या विस्तारामुळे पर्यावरणावरील परिणामाचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो शासनास सादर करण्यात आला.

सहसंचालक(जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक २१.०४.२०२६ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी आयोजीत करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी पत्र दिनांक २०.०३.२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना सदर प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, लातूर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक लोकसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक ३०एप्रिल, २०२६ रोजी दुपारी ११:३० वाजता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रणप मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्र. E220 /2026 BO/JD(WPC)/PHB-220 दिनांक २१.०४.२०२६ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४.०९.२०२६ व सुधारित अधिसूचनादिनांक ०१.१२.२००९ अनुसार खालील प्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली :-

१) मा. श्री केशव नेटके, - अध्यक्ष
अप्पर जिल्हादंडाधिकारी, लातूर

२)श्री. मनिष होळकर - सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर.

३)श्री. पी. व्ही. नाईक, - समन्वयक
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर.

सदर अधिसूचनेनुसार उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी लोकसुनावणी दिवसाच्या ३०दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया, इंग्रजीत दिनांक २७.०३.२०२६ रोजी लोकसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (Notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१)क्षेत्रीय कार्यालय,पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर- ४४०००१.
२)मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
३)महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर
४)मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, लातूर.
५)तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, ता. लातूर जि. लातूर
६)ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये– साखरा, सावरगांव, चिंचोलीरावावाडी, खंडापुर, पाखरसांगवी, हरंगुळ बु., भुईसमुद्रगा, अंकोली, वासनगांव, भोयरा, खोपेगाव, गंगापुर, पेठ, तालूका व जिल्हा लातूर.
७ )उपसचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई –४०००३२.

८ )मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईंट, २रा, ३रा आणि ४ था मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्रमांक ७, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कलजवळ, सायन (पुर्व), मुंबई- ४०००३२.
९ )प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर.
१० )उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर.
११ )संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ — मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध आहेत.
आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर यांचेकडे एकही सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या नाहीत.
समन्वयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

समन्वयक यांनी प्रतिपादन केले की, ही पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरण विषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिकांनी लोकसुनावणी त उपस्थित केलेल्या सुचना/आक्षेप यांची इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल व त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदर बैठकीची जशीच्या तशी चित्रफित (व्हिडिओ रेकॉर्डीग), बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, राज्यस्तरीय तज्ज्ञ मूल्यांकन समिती, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजकांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याची आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजने विषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदर प्रकल्प हा स्थानिक शेतकऱ्यांच्या हिताचा, स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणारा प्रकल्प आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी एकूण गुंतवणूक ही रु.९१६५ लाख (म्हणजे रु.९१.६५ कोटी) एवढी आहे. तर पर्यावरणी व्यवस्थापनासाठी सुमारे रु.९७८ लाख (म्हणजे रु.९.७८ कोटी) एवढी गुंतवणुक करण्यात येणार आहे. सदर विस्तारित प्रकल्पामुळे प्रकल्पात २५-३० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळणार आहे, परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात (Indirect business) प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेले पाणी हे तावरजा धरण, पाटबंधारे विभाग, लातूर यांच्या कडून पाणी पुरवठा पूर्ण करण्यात येईल. प्रकल्पात उत्पन्न होणाऱ्या औद्योगिक व घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार येईल .

प्रकल्पात १०,३७० झाडे लावले असुन पुढील तीन वर्षात ६,६३० झाडे विस्तारित प्रकल्पात लावण्यात येतील. तसेच कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (CER) एकुण खर्चाच्या १% खर्च करण्याचा प्रस्ताव असुन तो एकुण रु. ९२ लाख एवढा असेल. तसेच पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवल खर्च रु. ९७८ लाख तर आवर्ती खर्च रु. १४० लाख रुपये प्रति वर्ष एवढा असेल. प्रस्तावित प्रकल्पात वर्षाजल पुनर्भरण प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्प हा स्थानिक तसेच महाराष्ट्र राज्य व देशासाठी फायद्याचा आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पा विषयी पर्यावरणीय सूचना टिकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न, सूचना, आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तक/ प्रकल्प सल्लागार/पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**१) श्री तानाजी शिवाजी शिंदे, रा. अंकोली, ता.लातूर जि. लातूर.**

- सदर प्रकल्प विस्तारीकरणामुळे सांडपाण्या बाबत काय उपाययोजना केली आहे?
- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सांडपाण्यावर पुर्णपणे प्रक्रिया केली जाणार आहे त्यासाठी आपल्याकडे कार्यरत औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र – ईटीपी (Effluent Treatment Plan) अस्तित्वात असुन त्याच्या क्षमतेमध्ये वाढ केली जाणार आहे .

**२) श्री महेश हरिदास मुळे, रा. अंकोली, ता.लातूर जि. लातूर.**

- सदर प्रकल्प विस्तारीकरणामुळे हवेच्या प्रदुषणा बाबत काय उपायोजना केली आहे ?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हवा प्रदुषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसीप्रिटेटर आपल्याकडे उपलब्ध आहे सध्या कारखान्याकडे दोन चिमण्या आहेत यांना स्वतंत्र इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसीप्रिटेटर बसविण्यात आलेले आहे . त्यांची कार्यक्षमता 99% पेक्षा अधिक असुन सर्व उद्योगामध्ये धुलीकणांचे नियंत्रणासाठी याचा वापर सर्रास केला जातो.

**३) मा. सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती.**

प्रादेशिक अधिकारी छत्रपती संभाजी नगर यांनी मे. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना यांना खालील प्रमाणे प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

**१. "सिंचन विभाग, लातूर यांच्याकडून मंजूर करण्यात आलेला वार्षिक ०.१५ दशलक्ष घनमीटर पाणी वापर कोटा हा उद्योग व सिंचन विभाग/ म.प्र.नि.मंडळाच्या यांच्या करारनाम्यात किंवा संमती आदेशात नमूद केलेल्या पाणी वापराबाबत तफावत दिसुन येत आहे/ प्रमाणापेक्षा कमी आहे काय?"**

**प्रकल्प प्रवर्तक**:- पाण्याचा वापर हा तावरजा धरण यांच्या कडून होणार असून पाणी पुरवठा कराराची प्रत सादर केली आहे. तसेच पाण्याचा वापर हा करारातील नमुद अटीच्या मर्यादेबाहेर जाणार नाही. असा उल्लेख असलेले सिंचन विभागाकडून पाणी कराराची दुरुस्त केलेली प्रमाणित प्रत सादर करणार असल्याचे कळविले आहे.

**२. CO2 उत्सर्जन व्यवस्थापन योजना काय आहे?**

**प्रकल्प प्रवर्तक**:- मळीचा वापर असवणी प्रकल्पामध्ये,इथेनॉलचे उत्पादन घेणे करिता केला जात असताना निर्माण होणाऱ्या कार्बन डायऑक्साइड वायूचे शोष यंत्रणेच्या (CO2 Scrubber) साह्याने तो वेगळा केला जावून अधिकृत पुनर्चक्रीकरण करणाऱ्या विक्रेत्यास देण्याचा प्रस्ताव आहे.

**३. वाढलेल्या सांडपाण्याच्या प्रमाणाच्या संदर्भात विद्यमान ई.टी.पी.च्या (ETP) आधुनिकीकरणाचा तपशील?**

**प्रकल्प प्रवर्तक**:- अतिरीक्त औद्योगिक सांडपाणी व घरगूती सांडपाणी निर्मित होणार असून सदर सांडपाण्याबाबत शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्या करीता संचालनाची परवानगी (Consent to Operate) मिळण्यापूर्वी सदर ई.टी.पी.चे आधुनिकीकरण व विस्तार करुन त्याला वाढीव गाळप क्षमते योग्य करण्यात येईल असे सांगण्यात आले.

**४.तुम्ही स्थानिक शेतकऱ्याला प्रेसमड खत म्हणून वापरण्यासाठी देत आहात. त्यातून निर्माण होणाऱ्या मिथेन वायूचे प्रमाण मोजले जाते की नाही?**

**प्रकल्प प्रवर्तक:**- प्रेसमडचा वापर वेगवेगळ्या शेतामध्ये होत असताना त्याचा कुजण्याचा वेळ विभिन्न असतो हा तटस्थ चक्रिय कार्बन आहे. हा अविशिष्ट/ अकेंद्रित स्त्रोत असल्यामुळे त्याच्या मोजणीबाबत कोणतीही माहिती नाही असे कळविले.

प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ छत्रपती संभाजीनगर ई.टी.पी.ची माहिती प्रश्नकर्ते (श्री तानाजी शिवाजी शिंदे, रा. अंकोली, ता.लातूर जि. लातूर.) प्रश्न क्र. १ विस्ताराने पुन्हा एकदा सांगावे. अशी सुचना केली.

**प्रकल्प प्रवर्तक:**- यांनी सांगितले की, सध्याच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सक्रियत गाळ/पंक पद्धतीचा (ASP-Activated Sludge Process) या पद्धतीवर चालणार ई.टी.पी. (ETP) वापरत आहे . सदर ई.टी.पी. चे आधुनिकीकरण व विस्तार करून त्याला वाढीव गाळप क्षमतेयोग्य करण्यात येईल . सांडपाणी प्रक्रिया ई.टी.पी. (ETP) ही तीन टप्यामध्ये पुर्ण केली जाते. यामध्ये प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय असे टप्पे असतात.

- प्राथमिक प्रक्रियेमध्ये सांडपाण्यातील तरंगणारे ऑइल,ग्रीस व इतर कण वेगळे केले जातात. सांडपाण्याचा सामू (pH) उदासीन केला जातो.
- द्वितीय स्तरावरील प्रक्रियेमध्ये या पाण्यातील सेंद्रीय व कर्ब घटकांचे सुक्ष्मजीवाच्या मदतीने विघटन केले जातात.यामुळे पाण्याचा सी.ओ.डी (Chemical Oxygen Demand) मोठया प्रमाणात कमी होऊन पाणी शुद्ध होते.
- तिसऱ्या टप्प्यात या पाण्याला वाळु व सक्रियित कोळशाच्या (Chemical Activated Charcoal)गाळणीतून पुढे नेले जाते. ज्यामुळे पाण्याची गुणवत्ता वाढून ते प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या गुणधर्म मर्यादेत येते.
- साखर निर्मिती प्रक्रियेमध्ये उसातील पाण्याचे बाष्प होईल व त्याचे पुन्हा पाणी होईल त्या पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी बाष्पीभवन जल शुद्धीकरण (Condensate Polishing Unit) उभारले जाईल व घरगुती सांडपाण्यासाठी मल:निस्सरण प्रकल्प (Sewage Treatment Plant) उभारण्याचा प्रस्ताव या प्रकल्पात समाविष्ट आहे. सदर बाबतची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात देखील उपलब्ध केली आहे.

**समन्वयक:**- पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी कांही पर्यावरणीय सूचना, विचार, टिकाटिप्पणी, शंका वा आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले व पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

**अध्यक्ष:**- पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, येथे आपण प्रकल्प प्रवर्तक मे. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. विलासनगर, ता.जि. लातूर – (४१३५३१) महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ४,७५० प्रतीदिन पासून ७,५०० टन प्रती दिनपर्यंत (२,७५० टन प्रतीदिन विस्तार) विस्तारिकरण प्रकल्पा स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीसाठी एकत्र जमलेलो आहोत. प्रकल्पाचे सादरीकरण प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी केलेले आहे. त्यात त्यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी संपुर्ण माहिती दिलेली आहे. स्थानिकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी दोघा जनांचे सुचना उपस्थित केलेल्या आहेत प्रोसेडींग मध्ये त्यांचा लेखी खुलासा आला पा हीजे त्याचबरोबर ,प्रादेशिक अधिकारी यांनी मांडलेल्या प्रश्नाचे उत्तरे सविस्तर आले पाहिजे. प्रदुषणाबद्दल आलेल्या सुचनांचे प्रकल्पाच्या आराखडयात नियोजन आले पाहीजे. जल, वायु, मृदा प्रदुषण होवु नये याची दक्षता घ्यावी. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी

समाधानकारक उत्तरे दिलेली आहे. या सर्वांची नोंद घेण्यात आलेली असुन त्यांचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल व इतिवृत्त केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

**अध्यक्ष,** पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पुनःश्च एकदा उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पा विषयी काही सुचना, आक्षेप, टिकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

- भविष्यात प्रकल्पामधून उत्पन्न होणाऱ्या औद्योगीक सांडपाण्याचे प्रश्न तसेच हवा प्रदुषण व त्यावरील उपायोजना याची माहिती इतिवृत्तात समाविष्ट करावी असे सांगितले.
- विस्तारीत प्रकल्पासाठी आवश्यक पाण्याची पाटबंधारे खात्याचे कराराप्रमाणे परवानगी घ्यावी.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी समिती यांनी सदर बैठक पार पडण्यास सहकार्य केल्याबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानून पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(पी.व्ही नाईक)**
समन्वयक
पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी
समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,लातूर.

होळकर
**(मनीष होळकर)**
सदस्य
पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी
समिती तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,छत्रपती संभाजीनगर.

**(माननीय श्री केशव नेटके)**
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी
समिती तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, लातूर.